**प्रेसनोट दिनांक १८/०५/२०१९**

**समर्थ पोलीस ठाणे पुणे**

**रात्रीचे वेळी पार्किंग मधील पार्क केलेल्या दुचाकी व चारचाकी गाडयांच्या काचा फोडून नुकसान करणा-यांना समर्थ पोलीसांनी शोधून २४ तासात ताब्यात घेतले**

दि.१६/०५/२०१९ रोजी पहाटे ०३/३० वाजणेच्या सुमारास सोमवार पेठ, खडीचे मैदान या ठिकाणी श्री. शिंदे रा. सोमवार पेठ, पुणे यांची मारुती स्विफ्ट कार ही पार्क केली असताना काही अनोळखी तरुणांनी लोखंडी रॉड व लाकडी बांबुने गाडीची पुढील काच व ड्रायव्हर साईडची मागील काच फोडली. तसेच सदर भागातील रहिवासी पवार यांची इंडिका कार, श्रीमती कदम यांची निसान मायक्रा कार, श्री. आरोरा यांचा टाटा एस टेम्पो, तसेच श्री. जे.पी.ब्रदर्स यांची टाटा ईको, श्री. परतानी यांची हयुंदाई ग्रँड आयटेन कार, श्री. अग्रवाल यांची मारुती स्विफ्ट कार, श्री. पंचाक्षरी यांची स्कोडा लोरा कार, श्री. कदम यांची हयुंदाई असेन्ट कार, व श्री. गुप्ता यांची हयुंदाई सॅन्ट्रो कार या गाडयांच्या काचा देखिल सदर अनोळखी इसमांनी फोडून सुमारे २५,०००/- रुपयांचे नुकसान केले आहे.

सदर प्रकाराबाबत श्री. शिंदे यांनी दिलेल्या तक्रारीनुसार समर्थ पोलीस ठाणे गुरनं. १५२/२०१९ भादवि कलम १४३,१४७,१४९, ४२७ आर्म ॲक्ट कलम ४(२५) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. सदर गुन्हयातील तोडफोड करणारे इसम हे बुधवार पेठ व कसबा पेठ भागातील असल्याचे खात्रीलायक सुत्रांकडून माहिती मिळताच समर्थ पोलीस ठाण्यातील वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण कदम यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक प्रभाकर कापुरे, नितीन अतकरे, पोहवा. लोणकर, पोना शिंदे, पोशि साबळे, पोहवा काळे वगैरे पोलीस कर्मचा-यांनी त्वरेने हालचाल करुन १. अक्षय रवि पाटील,वय-२० वर्षे रा.बुधवार पेठ, पुणे २. प्रतिक उर्फ सॅन्डी संदिप वैराट,वय-२० वर्षे रा.कसबा पेठ,पुणे यांना ताब्यात घेऊन गुन्हयात अटक केलेली आहे. तसेच त्यांचे समवेत तीन अल्पवयीन मुलांना देखिल निष्पन्न करण्यात आले आहे. अशा रितीने तोडफोड करुन दंगा करणा-या तरुणांना समर्थ पोलीसांनी २४ तासाच्या आत शोधुन काढून अटक केलेली आहे.